**Akshardhara Research Journal**
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
**E ISSN -3048-8095 / Bimonthly / November-December 2024 / VOL -01 ISSUE-III**

12

# धनगर समाजाची संस्कृती, परंपरा व चालीरीती यांचा आढावा

**प्रा. डॉ. अरविंद बी. पाटील**
(समाजशास्त्र विभाग)
बी.एस.एस.पी.एम. कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सोनगीर ता.जि. धुळे (महाराष्ट्र)

---

**प्रास्ताविक**

धनगर समाज हा मूळ भारतीय असून आदिवासींमध्ये त्यांची गणना होते. मेंढ्या पालन हा त्यांचा प्रचलित व्यवसाय असल्यामुळे भटकंती करणे हा त्यांचा धर्म आहे. धनगर समाज हा महाराष्ट्राबरोबरच अनेक राज्यात विखुरलेला आहे. कानडी भाषेत त्याचे नाव दनगार असे आहे म्हणजे गुरे ढोरे त्यावरुन दन-गार धनगर गुरे ढोरे पाळणारा अशा क्रमाने हा शब्द बनला. आजही शेतीसह धनगर गाई म्हशी पाळण्याचा व्यवसाय करतात. परंतु मुख्य व्यवसाय मेंढ्या पाळणे हा होय.'संस्कृत भाषेत धांग म्हणजे डोंगर पर्वतात राहणारे लोक म्हणजे धनगर या उत्पत्ती दाखवता येते.'[१]

भारतात अनेक धर्म, जाती, भाषा असल्यामुळे त्यांची संस्कृतीही निरनिराळी आहे."या सर्व जाती जमाती मध्ये धनगर ही जात अति प्राचीन असून ती एक आदिवासी वन्य जात म्हणून सिद्ध होत आहे."[२] डॉ. इरावती कर्वे यांनी महाराष्ट्रातील धनगर हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील एक शूर, कष्टकरी, काटक व प्रामाणिक म्हणून ओळखला जाऊन मावळे म्हणून धनगरांना अग्रक्रम दिला जाई.

धनगर जमातीचे लोक गेल्या काही वर्षात निरनिराळ्या गावात स्थिरावले असले तरी त्यांचे भटकेपण पूर्णपणे संपले असे म्हणता येणार नाही. या दृष्टीने धनगरांचे सांस्कृतिक सामाजिक धार्मिक वेगळेपण पहावयास मिळते. महाराष्ट्रातील धनगर समाज मेंढपाळ होता तर त्यांच्यात अनेक दुर्बल घटकांपैकी धनगर हा एक घटक आहे. बहुसंख्य धनगर समाज दारिद्र्याने पिडलेला,गांजलेला व मिळेल तेथे वास्तव्य करणाराआहे.

**विषय विवेचन**

धनगर समाजाचे दैवत, धर्मश्रद्धा, अंधश्रद्धा व त्यांनी निर्माण केलेल्या कथा गायनाचे महत्व सामाजिक इतिहासात असाधारण आहे. इतिहासातील मराठेशाहीतील प्रतिभाशाली मल्हाराव होळकर व अहिल्याबाई होळकर यांचे योगदान पाहून इतर समाजाप्रमाणे धनगर समाजातही नव्या युगाचे आव्हाने स्वीकारण्यास कमी पडत नाही. इतर समाजबरोबरीने प्रतिष्ठेचे स्थान मिळविण्यासाठी व स्वतःच्या अस्मितेचा शोध त्यासाठी त्यांच्या पाठीशी बिरोबाचे बळ आहे असे मानतात.

**धनगर समाजाच्या परंपरा व व्यवसाय**

संस्थानिक काळात राजेरजवाडे व सरदार जंगलात शिकारीसाठी जात त्यावेळी दुर्गम जंगलातील रस्ते शिकारी व प्राण्यांचा मागमोसठिकाणेदाखविण्याचे काम व माळरानाच्या ओसाड प्रदेश जेथे पाऊस कमी असला तरी मेंढपाळीसाठी तो भाग उत्तम मानला जातो. मेंढ्या निरोगी व चांगल्या प्रकारे वाढतात तसेच या शेळ्यामेंढ्या रोगराई व आजारांनी दगावत नाहीत. चिखल दलदल नसलेली जमीन व स्वच्छ वातावरण डोंगर कपारी व पठारी भाग मेंढपाळ व्यवसायाला पोषक असतो. त्यामुळेच डोंगर कपारीला डोंगराळ भागात धनगर मेंढपाळ स्थायिक झाला असावा. जत, आटपाडी, माण, सांगोला या भागात याच कारणाने धनगर समाज जास्त प्रमाणात दिसून येतात. खंबाटकी घाट, नीरा नदीचा काठ, शिरवळ, बारामती व माळशिरस पर्यंतचा मेंढपाळ धनगर मोठ्या प्रमाणात दिसून येतो तसेच मराठवाड्यातही मेंढपाळ धनगर आहेत.

संस्थानिकांच्या काळात पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे व कोकण भागात मेंढपाळांना चराचुराने दिली जात. सैन्यातील सरदारांना इनाम व बहादुरी,गाजविलेल्या यांना देशमुखी पाटीलकी

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved 

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / November-December 2024 / VOL -01 ISSUE-III

बहाल करण्यात येत होती. संस्थानिकांच्या काळात पश्चिम महाराष्ट्र कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे या भागात मेंढपाळांना चराऊ राने दिली जात असत. सैन्यातील सरदारांना इनाम व बहादुरी गाजवलेला देशमुखी, पाटीलकी बहाल करण्यात येत होती. त्यामुळेच धनगर समाज मोठ्या प्रमाणात ग्रामीण विभागात स्थायिकझाला असावा.

धनगर समाजाची संस्कृती ही मोठी लक्षवेधक अशी आहे. गुलालभंडाऱ्याने गळयात ढोल टिपरीबरोबर पायाची हालचाल घामाने माखलेले पुष्ट शरीर धुंद वातावरण अगरबत्तीचा धूप भंडाऱ्याचा संमिश्र सुगंध व मनात भाविकतेचे वातावरण निर्माण करणारा झांज गुलाल-खोबरे उधळले जाते. अधून मधून विरोबाचा चांगभलेचा जयघोष बिरोबाच्या वनात नाचणारा धनगर पाहिला की या समाजाची एक स्वतःची आपली संस्कृती असल्याचे दिसून येते. भोळाभाबडा पण उदार मनाचा हा धनगर समाजदेवाच्या नावाने खोबरे खारकातर उधळतोच पण आपले तान्हुले बाळही नवसाने उधळतो. त्या इवल्याश्या जीवाला झोळीतझेलतात व पुन्हा देवाचा जयघोष सुरू होतो. नवस फेडण्याची ही तऱ्हा अशी तऱ्हेवाईकचअशा प्रकारे जीवन जगणारा या धनगर समाजाची संस्कृती आपल्याला दिसून येते. परंपरेने चालत आलेल्या लोकजीवन विशेषाच्या लोक जीवन पद्धतीचा संस्कृतीत समावेश होत असल्याने लोकसंस्कृतीत हे जीवन विशेष पहावयास मिळतात. पारंपारिक समाजव्यवस्था, समाजव्यवस्थेतील जाती-जमातीची पारंपारिक जीवनपद्धती त्यांचे आचार-विचार, रूढी-परंपरा, धर्मकल्पना, त्यांची निवास पद्धती, भोजनातील पदार्थ, ते तयार करण्याची पद्धती,"त्यांची वेशभूषा, अलंकार, त्यांची सौंदर्यदृष्टी, त्यांच्या कला व भौतिक संस्कृती, लोकगीते, लोककथा, यासारख्या शब्द अविष्कार या पारंपारिक बाबी लोकसंस्कृतीतूनदिसून येतात."[३]

धनगरांच्या सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करताना मरीआई, म्हसोबा, बिरोबा, खंडोबा, आसरा, सटवाई ही दैवते व त्यासंबंधीची विधी महत्त्वाचे ठरतात. धर्मविधीचे स्वरूप त्या-त्या ग्रामदेवते प्रमाणे असते. मरीआईच्या उपासनेत मरीआईचा गाडा ओढणे गाव बांधणीचा विधी, बळी देण्याचा विधी, खंडोबाच्या उपासनेत भरीत रोडगा, तळी उचलणे, वाघ्या बनणे, सटवाईचा पाचवीचा विधि, आसराचा पूजा विधि, मेंढ्या कातरण्याचा विधी, मुंजोबाच्या उपासनेतील मुंजे जेवू घालणे यासारखे विधी धनगर लोकजीवनात पाळले जातात. गोंधळ, जागरण, सुंबरान, तळी उचलणे यासारखे कलाविष्कार धनगरांच्या सांस्कृतिक जीवनाचे महत्त्वाचे पैलू ठरतात.लोकवाङ्मय हे धर्माशी निगडित आहे हे धनगरांच्या काही गीतातून पहावयास मिळते.

१) स्त्री गीते २) सुंबरान ३) जागरण ४)गोंधळ ५)संस्कार गीते ६) सण-उत्सवांची गीते या संस्कृती संस्कारातूनच म्हसोबा, विरोबा, खंडोबा, मरीआई या देवताबरोबरच राम कृष्ण व सूर्य चंद्र यांचा लोक धर्मात वावर राहिला. प्राचीन काळापासून धनगर लोकमाणसांवर असलेला दैवतांचा प्रभाव पुढील काळातही कायम राहिला व त्यात भर पडत गेली व धर्माच्या कक्षा वाढल्या."धनगर जीवन धर्ममय आहे. जेव्हा धर्म हा जीवनाचा प्राणअसतो तेव्हा त्या समाजाच्या संस्कृतीतून, लोकसाहित्यातून धर्माचा अविष्कार घडत असतो."[४] नागर संस्कृतीपासून धनगर समाज नेहमीच दूर राहिलेला दिसून येतो. परिणामी त्याची स्वतःची अशी खास संस्कृती निर्माण झाली. परंपरेने ही संस्कृती जोपासली गेली व विकास युगाच्या नियमानुसार विकसित होत गेली व तिच्यात विकासाची गती नागर संस्कृती इतकी नसली तरी तिला स्वतःची अशी गती आहे. मानवी जीवन सुसह्य, सुंदर व समृद्ध बनविणे हेच कोणत्याही संस्कृतीला अभिप्रेत असते. भारतात वैभवशाली संस्कृती होती परंतु या संस्कृतीने बहुजन समाजातील सर्वच जमातींना अंधश्रद्धेत, धार्मिकतेत व कर्मकांडात जखडून ठेवलेले दिसते परंतु या संस्कृतीला छेद देण्याचे महान कार्य डॉ. आंबेडकरांनी केले."संस्कृती ही समाजातील वेगवेगळ्या समुहाच्या जीवन जगण्याच्या पद्धतीतून विकसित होते."[५] संस्कृतीचा धर्म प्राण आहे. धर्म जपण्यासाठी स्त्रिया उत्सव प्रसंगी विविध प्रकारची लोकगीते विधी गीते म्हणतात तर रांगोळी भिंतीवरील चित्रे, नक्षीकाम, विणकाम, भरतकाम अश्या अनेक विविध कला जतन करताना दिसून येतात.

धनगर समाजाचा ठेवा लोकसाहित्यातून दिसून येतो. अनादिकाळापासून हेच त्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडताना दिसते. कष्टप्रद दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे म्हणून प्रत्येक संस्कृतीत काही उत्सवांचे प्रसंग परंपरेने निर्माण झालेले दिसून येतात. धनगरांच्या दैनंदिन जीवनातही अशा काही घटना प्रसंगांना महत्त्वाचे स्थान आहे. त्यांच्यातील कलात्मक सर्जनशीलतेला अभिव्यक्त होण्याची संधी प्राप्त होते. वर्षभरात पाळले जाणारे सणवार, देवादिकांच्या यात्रा उत्सव, विवाहाच्या घटना-प्रसंग, शिकार शेतीची कामे व रानावनातील भटकंती अश्या वेगवेगळ्या प्रसंगी धनगरांच्या कलाविष्कार यांना जणू आवाहनच केले. यातून नृत्य गायन, नाट्य इत्यादी कलात्यांच्या समूह जीवनात प्रवेश करतात. हा कलाविष्कार वर्षानुवर्षाच्या परंपरेने संस्कारीत होऊन विकास पावतो. याच लोकआविष्कारतूनच लोककला व लोकसाहित्य यांची परंपरा बनत जाते. गर्भवती स्त्रीच्या पोटाला कुंकू लावणे म्हणजे जे होणारे अपत्य आहेत ते माझ्या लेकीचापती असेल किंवा मुलगी असेल तर माझ्या मुलाची वधू असेल व ठरल्याप्रमाणे ते लग्न लावून देतात. लग्नविधी काढल्यानंतर भावकीतील व्यक्ती मृत्यू पावली तर लग्न पुढे ढकलले जाते. या जमातीत मृतांना जाळतात व अविवाहितांना पुरतात. उत्तर क्रियेसाठी ब्राह्मण पुरोहित यांचेमार्फत श्राद्धविधीचाही प्रथा आहे. धनगरांची समृद्ध अशी लोकसंस्कृती आहे. भैरोबाच्या यात्रेत तसेच रात्रीच्या वेळी धनगर लोक आपली लोकगीते भल्या मोठ्या ढोलाच्या साथीवर गातात. या गीतात भैरोबाच्या कथा गुंफल्या आहेत.

'पहिलं माझं नमन गणपती देवाला'
'धरती मातेला मेघराय पित्याला'
'मेघराय पित्याला चंद्रसूर्य दोघाला'
'चंद्रसूर्य दोघाला हो ईश्वर पार्वतीला'
'ईश्वर पार्वतीला हो गादीवरच्या धन्याला'
'गादीवरच्या धन्याला हो जन्म दिला दोघाला'[६]

अशा प्रकारे या लोकगीतातून धनगर समाजाची लोकसंस्कृती व या लोकसंस्कृतीचे विशेष दिसून येतात. धनगरांचे सण-उत्सव ही इतरांप्रमाणेच ते साजरे करतात व जाती रिवाजानुसार आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवितात.

विविध सण समारंभाच्या प्रसंगी धनगरांची गाणी प्रसिद्ध आहेत. त्यातूनच त्यांची लोकगीतांची उभारणी व जडणघडण झालेली दिसून येते. त्यातूनच सामुहिक संदर्भ स्पष्ट होतात.

"सोनाराच्या ढालजी बसले होते पती"
"तुझ्या माझ्या जोडण्याची खरेदी केली होती"[७]

धनगर स्त्री लोक गीतातील अलंकाराचे उल्लेख ठिकठिकाणी दिसून येतात. हे अलंकार केवळ स्त्री पुरतेच मर्यादित असत नाही तर लहान मुलांना व पुरुषांना देखील कमी अधिक प्रमाणात अलंकार असतात. पण त्यांचे प्रमाण स्त्री अलंकारापेक्षा कमी असते. मराठी लोक गीते, ओवी गीते, स्त्रियांच्या अलंकारांनी नटलेले आहेत. अलंकारामुळे स्त्रीचे सौंदर्य उठून दिसते. स्त्रियांना अलंकाराची हौस असते. त्यांनी जास्त दिगिने घातले तर ते प्रतिष्ठेचे लक्षण दिसते. तो त्यांचा मूल स्वभाव आहे. इतर मराठी संस्कृतीनुसार स्त्रियांचाही अति महत्वाचा अलंकार म्हणजे कपाळावरील कुंकू हा अलंकार हे धनगर स्त्रियांच्या सौभाग्याचे प्रतिक आहे. या अलंकाराशिवाय ते इतर अलंकाराला महत्व देत नाही. कपाळावरील कुंकू म्हणजे सौभाग्याचे प्रतिक असते. धनगराच्या ओठावर तरळणारीगाणी उत्कट भावानुभव देतात. जीवनातील सुख दुःखाच्या विविध अनुभवाच्या भावनात्मक प्रत्येय देतात. धनगराचीउखाणी, म्हणीहसतखेळत आपल्याला कोड्यात टाकून गालावर खळी पाडतात. व आपल्याला एक वेगळ्या आनंदाचा प्रत्येय देतात. या गीतातील सुंदरता, भव्यता, दिव्यताव लोकमानाचे घडणारे दर्शन एक वेगळी अनुभूती देतो. या गीतातील शब्द मौखिक स्वरुपात व्याप्त होत असतात.

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / November-December 2024 / VOL -01 ISSUE-III

तो अंतरीचा उमाळ्याने ओथांबलेला असतो. या शब्दांना जीवनानुभवाचा स्पर्श असतो. ते जिवंतपणे साकार करण्याचे सामर्थ्य या शब्दात असल्याने या शब्दांच्या गुंफनातूनआकारास आलेले गीत एक उत्कट अनुभव देते. स्त्री जीवनाची विविध भाव छटा असलेली चित्रमालिका धनगर गीतातून उत्कट अनुभूती देताना दिसून येते. या गीतातून व्यक्त होणारे जीवनानुभव व भावानुभव आपल्या मनाची पकड घेतात. व आपण त्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवाशी एकरूप पावतो. त्यांचं जीवनातील आचार विचार या साऱ्यातून पाहण्याची दृष्टी स्पष्ट होते. धनगरांच्या गाण्याचा संबंध जीवनातील नैमित्तिक घटनांशी असतो. त्यातून लोक जीवनाचे विशेष प्रकट होतांना दिसून येतात.

**निष्कर्ष**

१. धनगर समाज हा मूळ भारतीय आहे व भटकंती करणारे गुरे-ढोरे चालणारे मेंढपाळ करणारी जमात म्हणून ओळखली जाते. अलीकडे शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्यात जनजागृती आढळून येते व शिक्षणाच्या माध्यमातूनच ते प्रवाहात येऊन त्यांनी स्वतःचा विकास केल्याचे आढळून येते.
२. धनगर समाजात मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा आढळून येते. शुभ अशुभाची कल्पना त्यांच्यात दिसून येते. तसेच भूत-पिशाच्च विषयक समजुती अमावस्या-पौर्णिमेला भुत फिरणे या कल्पना त्यांच्यात दिसून येतात.
३. मंत्रतंत्र,फेरीमारणे, जादूटोणा, जडीबुटी या संकल्पना धनगर समाजात मोठ्या प्रमाणात आढळून येतात.
४. धनगर समाजाची लोकसंस्कृती याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. ढोल-ताशाच्या तालावर नाचणे,बिरोबाच्या यात्रेत उत्सवात नाचणेयातून त्यांची स्वतःची एक ओळख निर्माण झाली आहे. तसेच गोंधळ, जागरण, सुंबरान, तळी उचलणे यासारख्या कलाविष्कारतूनच त्यांच्या सांस्कृतिक जीवनाचे महत्त्व पटते.
५. धनगर समाज हा नागर संस्कृतीपासून नेहमीच दूर राहिला आहे. शेतीकाम शेळयामेंढ्या यातच हा समाज रमताना दिसून आला.

**संदर्भ**

१. डॉ.ज्ञानेश्वर गवते - धनगरांच्या लोकसाहित्यातील समाज दर्शन कैलास पब्लिकेशन औरंगाबाद प्रथम आवृत्ती पृ.१६
२. डॉ.ज्ञानेश्वर गव्हाणे - धनगरांच्या लोकसाहित्यातील समाज दर्शन कैलास पब्लिकेशन औरंगाबाद प्रथम आवृत्ती पृ.१६
३. डॉ. विद्या व्यवहारे - लोकसाहित्य लोकसंस्कृती प्रथम आवृत्ती २००२ पृ.२७
४. डॉ.ज्ञानेश्वर गवते - धनगरांच्या लोकसाहित्यातील समाज दर्शन कैलास पब्लिकेशन औरंगाबाद प्रथम आवृत्ती पृ.१३०
५. डॉ.ज्ञानेश्वर गवते - धनगरांच्या लोकसाहित्यातील समाज दर्शन कैलास पब्लिकेशन औरंगाबाद प्रथम आवृत्ती पृ.१३१
६. डॉ.नागनाथ कदम - महाराष्ट्रातील भटका समाज संस्कृती व साहित्य प्रतिमा प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती
७. डॉ.ज्ञानेश्वर गवते - धनगरांच्या लोकसाहित्यातील समाज दर्शन कैलास पब्लिकेशन औरंगाबाद प्रथम आवृत्ती पृ.२०८

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved 